**"एप्रिल २०१८" या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या <u>महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती...</u>**

**(क) <u>शासन निर्णय / अधिसूचना</u>**

- सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) व या विभागांतर्गत अन्य पाच कार्यालयांच्या आस्थापनेवरील १९५ अस्थायी पदांच्या दि. २८ फेब्रुवारी २०१८ व ३० सप्टेंबर २०१८ पर्यंत पुढे चालू ठेवण्याच्या शासन निर्णयातील, उपसचिव (सादरकर्ता अधिकारी-१) या पदाऐवजी सहसचिव (सादरकर्ता अधिकारी-१) असे शुद्धीपत्र दिनांक २ एप्रिल २०१८ रोजी निर्गमित करण्यात आले आहे.

- दिनांक ४ एप्रिल २०१८ च्या शासन निर्णयान्वये "महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित या कंपनीशी संबंधित प्रकरणे / बाबी" हा विषय माहिती तंत्रज्ञान विभागाकडे हस्तांतरित करण्यात आला आहे.

- दिनांक ५ एप्रिल २०१८ च्या पत्रान्वये, केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालय क्रमांक-42/06/2018-P & PW(G), दिनांक २२ मार्च २०१८ च्या कार्यालयीन ज्ञापनान्वये दिनांक १ जानेवारी २०१८ पासून लागू करण्यात आलेला २% वाढीव दराने महागाई भत्ता व ज्ञापनातील इतर तरतुदी महाराष्ट्र राज्य संवर्गातील अखिल भारतील सेवेतील निवृत्तीवेतनधारक / कुटुंब निवृत्तीवेतनधारकांना लागू करण्यात आला आहे. त्यानुसार त्यांना दिनांक १ जानेवारी २०१८ पासून ७% दराने महागाई भत्ता अनुज्ञेय राहिल.

- दिनांक ९ एप्रिल २०१८ च्या शासन निर्णयान्वये मुख्यमंत्री सुकर्मी पुरस्कार योजना मंत्रालयीन संवर्गासाठी राबविण्यासाठी सहसचिव (कार्यासन-१४), सामान्य प्रशासन विभागाच्या अध्यक्षतेखाली संनियंत्रण समिती गठित करण्यात आली आहे.

- दिनांक ९ एप्रिल २०१८ च्या शासन निर्णयान्वये समुपदेशनाव्दारे बदलीबाबतचे धोरण निश्चित करण्यात आले आहे.

- दिनांक १२ एप्रिल २०१८ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत करण्यात येणाऱ्या परीक्षांमधील गैरप्रकार रोखण्यासाठी सुरक्षा यंत्रणेतील पोलीसांमार्फत उमेदवारांची झडती / तपासणी करण्यासाठी परीक्षेच्या दिवशी प्रत्येक उपकेंद्रावर ३ पुरुष व २ महिला पोलीसांना नियुक्ती करण्यास व त्यांना प्रतिदिन प्रत्येकी रु.२००/- या दराने मानधन देण्यास शासन मंजुरी देण्यात आली आहे.

- दिनांक १३ एप्रिल २०१८ च्या शासन निर्णयान्वये निम्न पदावरील किमान सेवा प्रतिवर्षी १ सप्टेंबर किंवा विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीच्या दिनांकास विचारात घ्यावी.

- दिनांक २४ एप्रिल २०१८ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र धोरण संशोधन संस्थेच्या कामकाजाची रचना व स्वरुप ठरविण्यासाठी नियुक्त केलेल्या सल्लागार समितीची पुनर्रचना करण्यात आली आहे.

- दिनांक २४ एप्रिल २०१८ च्या शासन निर्णयान्वये यशवंतराव चव्हाण व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, पुणे या संस्थेस सन २०१८-१९ या वित्तीय वर्षाच्या प्रशिक्षण शुल्काच्या एकूण रु.४००.०० लाख इतक्या अनिवार्य खर्चापैकी एप्रिल ते जुलै २०१८ या चार महिन्यांकरिता एकूण रु.१००.०० लाख इतके अनिवार्य सहायक अनुदान (पहिला हप्ता) मंजूर करण्यात आला आहे.

- दिनांक २४ एप्रिल २०१८ च्या शासन निर्णयान्वये मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, नाथनगर (उत्तर), पैठण, औरंगाबाद या संस्थेस सन २०१८-१९ या वित्तीय वर्षाच्या प्रशिक्षण शुल्काच्या एकूण रु.१२०.०० लाख इतक्या अनिवार्य खर्चापैकी एप्रिल ते जुलै २०१८ या चार महिन्यांकरिता एकूण रु.१९.०० लाख इतके अनिवार्य सहायक अनुदान (पहिला हप्ता) मंजूर करण्यात आला आहे.

- दिनांक २४ एप्रिल २०१८ च्या शासन निर्णयान्वये डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या संस्थेस सन २०१८-१९ या वित्तीय वर्षाच्या प्रशिक्षण शुल्काच्या एकूण रु.१२०.०० लाख इतक्या अनिवार्य खर्चापैकी एप्रिल ते जुलै २०१८ या चार महिन्यांकरिता एकूण रु.१९.०० लाख इतके अनिवार्य सहायक अनुदान (पहिला हप्ता) मंजूर करण्यात आला आहे.

- दिनांक २५ एप्रिल २०१८ च्या शासन परिपत्रकान्वये कक्ष अधिकारी विभागीय परीक्षा २०१७ मधील २०४ उमेदवारांचा निकाल जाहिर करण्यात आला आहे.

- मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळ बैठकीच्या वेळी विधानभवन उपाहारगृहामार्फत बाहेरील खाद्यपदार्थ उपलब्ध करुन देण्यात येतात, त्याप्रमाणे मा.सभापती व मा.अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखालील संसदीय कामकाज सल्लागार समितीच्या बैठका तसेच परदेशी पाहुण्यांच्या शिष्टमंडळासोबत होणाऱ्या बैठकांव्यतिरिक्त अन्य कोणत्याही बैठकांसाठी विधानभवन उपाहारगृहात तयार होणाऱ्या खाद्यपदार्थांव्यतिरिक्त अन्य कोणतेही बाहेरील खाद्यपदार्थ उपलब्ध करुन देणे शक्य होणार नसल्याचे, दिनांक २६ एप्रिल २०१८ च्या शासन परिपत्रकान्वये स्पष्ट करण्यात आले आहे.

### (ख) <u>बदली / मुदतपूर्व बदली / बदलीस स्थगिती / बदली रद्द / पदस्थापनेत बदल</u>

- भारतीय प्रशासन सेवेतील ३४ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.
- अवर सचिव, कक्ष अधिकारी, वरिष्ठ स्वीय सहायक संवर्गातील अनुक्रमे २, १, १ अशा ४ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.
- अवर सचिव, कक्ष अधिकारी संवर्गातील अनुक्रमे १, ३ अशा ४ अधिकाऱ्यांच्या पदस्थापनेत बदल करण्यात आला आहे.
- कक्ष अधिकारी संवर्गातील ४ अधिकाऱ्यांना कार्यमुक्त करण्यात आले आहे.

### <u>(ग) पदोन्नती / प्रपत्र बढती व मुदतवाढ / पदावनती / पदोन्नतीचा मानीव दिनांक व नियमित दिनांक</u>

- उपसचिव, कक्ष अधिकारी सहायक कक्ष अधिकारी व लिपिक-टंकलेखक संवर्गातील अनुक्रमे १, ५, २, ४३ अशा ५१ अधिकारी कर्मचाऱ्यांना सहसचिव, अवर सचिव, कक्ष अधिकारी व सहायक कक्ष अधिकारी पदावर पदोन्नती देण्यात आली आहे.

- अवर सचिव व सहायक कक्ष अधिकारी संवर्गातील प्रत्येकी एका अधिकारी / कर्मचाऱ्याच्या प्रपत्र बढतीस मुदतवाढ देण्यात आली आहे.

### (घ) <u>प्रतिनियुक्ती / प्रतिनियुक्तीस मुदतवाढ / प्रत्यावर्तन</u>

- अवर सचिव, कक्ष अधिकारी संवर्गातील प्रत्येकी एका अधिकाऱ्याला प्रतिनियुक्ती देण्यात आली आहे.
- अवर सचिव, कक्ष अधिकारी संवर्गातील अनुक्रमे १, २ अशा ३ अधिकाऱ्यांचे प्रत्यावर्तन करण्यात आले आहे.
- अवर सचिव, कक्ष अधिकारी संवर्गातील अनुक्रमे ३, १ अशा ४ अधिकाऱ्यांच्या प्रतिनियुक्ती मुदतवाढ देण्यात आली आहे.

### (च) <u>प्रशिक्षण</u>

- दिनांक ५ एप्रिल २०१८ च्या शासन परिपत्रकान्वये सहायक कक्ष अधिकारी सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण व परीक्षा २०१८ साठी दिनांक ५ मे २०१८ पर्यंत अर्ज मागविण्यात आले आहेत.

- दिनांक ५ एप्रिल २०१८ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन प्रशासकीय विभागातील लिपिक / लिपिक-टंकलेखक यांची सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा २०१८ ही दिनांक २१ एप्रिल २०१८ रोजी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा कक्ष, वस्तू व सेवा कर भवन, माझगांव, मुंबई येथे आयोजित करण्यात आली.

***********